**म.स.कौ.हि.का. अर्ज क्र. १७/२०१८**

**नि.क्र. ४० वरील आदेश**

०१. प्रसतुतचा अर्ज सामनेवाला याने अर्जदार हिने दिलेल्या शपथपत्रातील मजकुर वगळण्याकामी दाखल केला आहे. अर्जदारा तर्फे सदर अर्जास म्हणणे देवुन विरोध दर्शविण्यात आला.

०२. सामनेवाल्याच्या कथनाप्रमाणे न्यायालयाने दिनांक २५/१०/२०१८ रोजी नि.क्र. ०७ वर आदेश परित करुन सामनेवाला क्र. २ ते ४ यांचे नावे प्रकरणामधुन वगळली आहेत. परंतु अर्जदाराने कोणतीही दुरुस्ती न करता शपथपत्रामध्ये परिच्छेद क्र. १ मध्ये ओळ क्र. ३ ते ५ व शेवटची ओळ तसेच परिच्छेद क्र. २ मध्ये पाचवी व सहावी ओळ यामध्ये तसेच परिच्छेद क्र. ५ मध्ये ओळ क्र. २ ते ५ मध्ये अनावेदक क्र. २ ते ४ बद्दल उल्लेख केला आहे. त्यामुळे सदर मजकुर अर्जदाराचे शपथपत्रामधुन वगळण्यात यावा. अर्जदार याच्या कथनाप्रमाणे सामनेवाला क्र. २ ते ४ हे अर्जदार हिचे व सामनेवाला क्र. १ याचे नातेवाईक असल्याने त्यांच्याबध्दल व त्यांनी दिलेल्या त्रासाबद्दल शपथपत्रात लिहीणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०३. दोन्ही बाजुंचा युतिवाद ऐकला. कागदपत्रांची पाहाणी केली. ही बाब विवादीत नाही की, दिनांक २५/१०/२०१८ रोजीच्या आदेशानुसार अर्जामधुन सामनेवाला क्र. २ व ४ यांचे नाव कमी करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. प्रस्तूत प्रकरण हे कौटुंबिक हिंसाचार कायद्या अंर्तगत दाखल केलेले आहे. यामध्ये

अर्जदार हिने नि.क्र. ३९ मध्ये दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये सामनेवाला क्र. १ व त्याचे ईतर नातेवाईक यांनी दिलेल्या तथाकथीत त्रासाबद्दल शपथेवर कथन केले आहे. अद्यापपावेतो सामनेवाला तर्फे अर्जदाराचा उलटतपास घेणे प्रलंबित आहे. एखाद्या पक्षकाराने दाखल केलेल्या शथत्रामधील मजकुर हा संपुर्णतः संबंधीत तथ्यास सोडुन असल्यास अशा मजकुराबाबत विचार होणे क्रमप्राप्त ठरते. परंतु त्या परिस्थितीत देखील दुस-या बाजुस त्या पक्षकाराची उलटतपास घेण्याची व सबंधीत नसलेल्या तथ्याबाबत प्रश्न विचारण्याची संधी आहे ही बाब विचारात ठेवुन आदेश होणे क्रमप्राप्त असते. श्पथपत्रामधील मजकुराबाबत मजकुर काढुन टाकण्याबाबत आदेश करणे न्यायोचीत व कायद्यास अनुसरुन ठरत नाही. कारण सदर मजकुर हा शपथपत्र सादर करण्या-या व्यक्तीने शपथेवर सांगितलेला असुन तो पुरावा कायद्यानुसार पुरावा म्हणुन गणला जातो. अशापरिस्थितीत एखाद्या पक्षकारास पुरावा देण्यापासुन प्रतिबंधीत करणे योग्य होत नाही. प्रस्तूत प्रकरणात अर्जदाराच्या कथनाप्रमाणे शपथपत्रामध्ये नमुद मजकुर तिला झालेल्या त्रासाबाबत असल्याने सदर मजकुर हा प्रकरणाशी संबंधीत आहे. त्यामुळे या शपथपत्रमधुन हा मजकुर वगळण्याची विनंती मान्य होवु शकत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यावरुन खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

नि.क्र. ४० लगतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SHAIKH AARISH SHAIFODDIN
Date: 2022.09.01 17:07:04 +0530

(ए.एस.शेख)

दिनांकः २५/०८/२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरखेड